# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

सूचना का अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ७८/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. आशिम देब**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ कार्यालय अधिक्षक**
अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक**
प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ००१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १६.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००१८१२ प्रकरणी आयोगाने दि.०६.१२.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"प्रशिक्षण व खास पथक विभागातील जन माहिती अधिकाऱ्यांनी सकृतदर्शनी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. अपिलार्थींच्या अर्जावर सर्व संबंधीत विभागांनी कार्यवाही करुन माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य पोलीस अकादमीतील जन माहिती अधिकाऱ्यांनी दोन अधिकाऱ्यांची प्राप्त माहिती अपिलार्थींना दि. २४.१२.२०१८ पर्यंत पोस्टाने पाठवावी व उर्वरित दोन अधिकाऱ्यांची माहिती प्राप्त झाल्यावर दि. ३१.०१.२०१९ पर्यंत पाठवावी."

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र. ७८/२०१९ मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि. ३०.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, आयोगाचे आदेश दि. ०६.१२.२०१८ च्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना दि.०२.०५.२०१९ रोजी माहिती देण्यात आलेली आहेत व त्याबाबतचा अहवाल आयोगास दि. १६.०२.२०२१ रोजी सादर केला आहे.

जन माहिती अधिकारी यांचा दि. १६.०२.२०२१ रोजीचा अहवाल आयोगाच्या अभिलेखावर उपलब्ध आहे.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, आयोगाचे आदेश दि. ०६.१२.२०१८ नुसार उपलब्ध असलेली माहिती तक्रारकर्त्यास देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ३१.०५.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**